# महाराष्ट्र शासन

## कार्यालय - जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, तळमाळा, रविभवन समोर,
ईस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाइन, नागपूर

Email:swozpngp@gmail.com Fax & ph.No.- 0712-2564324

क्र. जिपना /सकवि /ई-शिष्यवृत्ती / २०१५-१६/ 935 नागपूर दि. २२/०४/२०१६

शिक्षण विभाग आवक क्र. 1907 दिनांक 27/4/16

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
माध्यमिक / उच्च प्राथ. / प्राथमिक,
म.न.पा. नागपूर

विषय:- **समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनेचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, शाळांनी एकदा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सदर अर्जाचा योग्य तो मागोवा त्याबाबतची तांत्रिक माहिती नसल्यामुळे त्यांना घेता येत नाही. त्या अनुषंगाने ऑनलाईन शिष्यवृत्तीकरिता भरलेल्या अर्जाचा मागोवा घेण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या **सूचना आपले अधिनस्त सर्व शाळांना लेखी व बैठक आयोजित करून देण्यात याव्या**, ही विनंती.

१. ज्या शाळांनी ऑनलाईन अर्ज सादर करून त्याची प्रत सर्व आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जि. प. नागपूर येथे सादर केली असेल त्यांनी mahaeschol.maharashtra.gov.in या शिष्यवृत्तीच्या वेबसाईटवर शाळेच्या Udise number व्दारे लॉगीन करून योजनेचे नाव निवडून अहवाल यादी मधील विद्यार्थ्यांची यादी हा विकल्प निवडून वर्षनिहाय याद्यांचे अवलोकन करावे. सर्व पात्र विद्यार्थ्यांची अर्जस्थिती Aproved आहे याबाबत खात्री करावी. सदर अर्जस्थिती केवळ sent for approval, created किंवा Hold अशी असेल तर तात्काळ कार्यालयात सादर केलेल्या प्रस्तावाच्या पोच (Receied O/C) सह कार्यालयात संपर्क साधावा. (Hold वर असलेले अर्ज विद्यार्थ्यांच्या तपशीलात काही आवश्यक बदल घडविण्यासाठी शाळेच्याच आयडीवर परत आले असतात व ते दुरूस्तीसह लवकरात लवकर पुन्हा पाठविणे अपेक्षित आहे, याची नोंद घ्यावी.)

२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नागपूर यांनी यापुर्वीच दिलेल्या सूचनेनुसार ई-शिष्यवृत्ती अंतर्गत शाळेच्या युझर-आयडी मधून कोणत्याही शिष्यवृत्तीकरिता ऑनलाईन भरलेल्या अर्जांमधील सर्व विद्यार्थी व त्यांच्या तपशीलाबाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापक सर्वस्वी जबाबदार राहतील. त्याचप्रमाणे शाळेने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले बँक खाते क्रमांक व IFSC code अचूक भरावेत. **यदाकदाचित अनावधानाने बँक खाते क्रमांक चुकलाच तर ऑनलाईन भरलेल्या चुकीच्या खातेक्रमांकावर शिष्यवृत्ती जमा झाली किंवा नाही याबाबतची शहानिशा करून त्याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील, याची नोंद घ्यावी.** त्याचप्रमाणे ऑनलाईन भरलेल्या बँक खाते क्रमांकावर बँकांच्या नियमानुसार सातत्याने व्यवहार करित राहणेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरून सूचित करावे जेणे करून सदर बँक खाते कोणत्याही परीस्थितीत तात्पुरते अथवा कायमचे बंद पडू नये.

३. समाज कल्याण कार्यालयात शिष्यवृत्तीबाबत विचारणा करण्यासाठी परस्पर पालकांना न पाठवता शाळेने शाळेतीलच जबाबदार व्यक्तीस आवश्यक कागदपत्रे तसेच Udise number सह पाठवावे त्यामुळे काही तांत्रिक अडचण असेल तर ती सोडवणे शक्य होईल.

४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नागपूर यांनी यापुर्वीच दिलेल्या सूचनेनुसार शाळांनी अर्ज सादर करतांना हार्डकॉपीसह जोडलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांचा संपूर्ण संच शाळेच्या कार्यालयीन प्रतीसह नस्तीला लावणे आवश्यक आहे. जेणे करून शाळेच्या शिष्यवृत्तीबाबतच्या तपासणीच्या वेळी सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होतील.

श्री. गोसावी सर

28/04/16
Education Officer
Nagpur Municipal Corporation

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर